भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने / बदलीने होणाऱ्या पदस्थापनेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र.एएफओ-१०२६/प्र.क्र.०१/वने-०७,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २७ ऑगस्ट, २०२६

वाचा : शासन आदेश समक्रमांक दि. १८.०६.२०२६

**<u>शासन आदेश:</u>**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने, तसेच भारतीय वनसेवा (संवर्ग) नियम १९६६ व भारतीय वनसेवा (वेतन) नियम, २०१६ यामधील तरतुदींच्या अधीन राहून खाली नमूद केलेल्या पदस्थापनेच्या प्रतीक्षेत असलेल्या/ कार्यरत भारतीय वन सेवेमधील (IFS) अधिकाऱ्यांची पदोन्नतीने / बदलीने, प्रशासकीय कारणास्तव पुढीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | पदस्थापनेचे पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. विवेक खांडेकर (१९९५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे | प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), नागपूर |
| २ | श्रीमती टी. ब्युला एलिल मती (२०१२) वनसंरक्षक | मुख्य महाव्यवस्थापक (नियोजन) एफ डी सी एम लि. नागपूर |
| ३ | श्री. अमलेंदू पाठक (२०१३) उप वनसंरक्षक (पदस्थापनेच्या प्रतिक्षेत) | उप वनसंरक्षक (कार्य आयोजना) यवतमाळ |
| ४ | श्री. कुशाग्र पाठक (२०१६) उप वनसंरक्षक | प्रादेशिक व्यवस्थापक एफ डी सी एम लि. नाशिक |
| ५ | श्री. अग्रिम सैनी (२०१९) उप वनसंरक्षक | मुख्य कार्यकारी अधिकारी, एफ डी सी एम गोरेवाडा झु. लि. नागपूर |
| ६ | डॉ. बी. एन. स्वामी (२०१९) उप वनसंरक्षक (पदस्थापनेच्या प्रतिक्षेत) | उप वनसंरक्षक (प्रा) पांढरकवडा |
| ७ | श्री. धनंजय वायभासे (२०१९) उप वनसंरक्षक | उप वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), नाशिक |
| ८ | श्री. यशवंत श्रीरामजी बहाळे (२०१९) उप वनसंरक्षक (प्रा) पांढरकवडा | उप वनसंरक्षक (वन्यजीव) मेळघाट व्याघ्र प्रकल्प, चिखलदरा |

**अनुक्रमांक १ व ७ वर दर्शविलेले पद**: *प्रशासकीय कारणास्तव, भावसे (संवर्ग) नियम, १९६६ च्या नियम क्र. ४ (२) अन्वये मूळ संवर्ग पद आस्थगित ठेवून व प्रस्तावित पद तात्पुरत्या स्वरुपात संवर्गास जोडून/जोडलेल्या पदावर पदस्थापना करण्यात आली आहे.*

**अनुक्रमांक २, ४ व ५ वर दर्शविलेले पद:**

*प्रशासकीय कारणास्तव, भावसे (वेतन) नियम, २०१६ च्या नियम क्र. १२ (४) अन्वये पदस्थापना केलेले संवर्गेतर पद (ex-cadre post) हे पदस्थापना केलेल्या अधिकाऱ्यांच्या मूळ संवर्गाच्या समकक्ष घोषित करून पदस्थापना करण्यात आली आहे.*

**अनुक्रमांक २, ४, ५ व ७** येथील नमूद भारतीय वन सेवेमधील (IFS) अधिकाऱ्यांची बदलीने प्रशासकीय कारणास्तव वाचा येथील दि. १८.०६.२०२६ रोजीच्या आदेशात बदल करुन सुधारित पदस्थापना करण्यात येत आहे.

२. शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत पुढील नमूद रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार त्या पदासमोरदर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी ग्रहण करावा.

| **पदाचे नाव** | **अधिकाऱ्याचे नाव** |
|---|---|
| प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे | श्री. विवेक खांडेकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), नागपूर |

उर्वरित रिक्त पदांच्या अतिरिक्त कार्यभाराचे आदेश प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे स्तरावरून निर्गमित करावे. एफ डी सी एम लि. मधील अतिरक्त कार्यभाराबाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी आवश्यक आदेश निर्गमित करावेत.

३. सर्व पदस्थापना/बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्देश तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांच्याकडून प्राप्त आदेशानुसार त्यांचा कार्यभार संबंधित अधिकाऱ्यास हस्तांतरित करुन नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. जे अधिकारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यास टाळाटाळ करतील त्यांच्यावर संबंधित सेवा नियमांतर्गत कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८२७१३५४२२१०४० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Niketa Chandrakant Pande

Digitally signed by Niketa Chandrakant Pande
DN: c=IN, o=Personal, title=0604, pseudonym=wv9oy3k0sexn1c65fdtglij7pbqrah48, 2.5.4.20=309456ebcbdcd03a60aae19aec3b84a3afdb291580e74905d41ed1c50ccbfa98, postalCode=400006, st=Maharashtra, serialNumber=6ba717730286cb27705342ddd9dfe40455726e91d15e1892b34f40a2e36fce4d, cn=Niketa Chandrakant Pande
Date: 2026.08.27 13:55:54 +05'30'

**( निकेता पांडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

२. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव

३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव
४. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
६. अपर मुख्य सचिव (महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्या., नागपूर
११. संबधित प्रधान मुख्य वन संरक्षक / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक /वनसंरक्षक / उप वनसंरक्षक
१२. उप सचिव (ई-शाखा), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. उप सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. अवर सचिव (फ-७अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सहायक संचालक (भावसे लेखा), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती.